**प्रसिध्दी पत्रक**          **दिनांक १४/०६/२०२४**

आरोपी लोकसेवक १) श्री. छगन उत्तमराव पाटील, सह दुय्यम निबंधक (वर्ग-२), सह निबंधक कार्यालय सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २) श्रीमती वंदना छगन पाटील.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पो.स्टे. बेगमपुरा छत्रपती संभाजीनगर शहर गु.र.नं. 171/2024 कलम 13(1)(ब) व (2) भ्र.प्र.अ.1988 सह भादंवि. कलम 109. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | १) श्री. छगन उत्तमराव पाटील, सह दुय्यम निबंधक (वर्ग-२), सह निबंधक कार्यालय सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २) श्रीमती वंदना छगन पाटील. |
| **अपसंपदा रक्कम** | :- | 1,80,80,155/-**रुपये ( एक कोटी, ऐंशी लाख, ऐंशी हजार, एकशे पंचावन्न रुपये )** |
| थोडक्यात माहिती | :- | यातील आ.लो.से. श्री. छगन उत्तमराव पाटील, सह दुय्यम निबंधक (वर्ग-२) यांचे विरुध्द दिनांक ०२/०३/२०२४ रोजी सापळा कारवाई नंतर पो.स्टे. सिल्लोड शहर गु.र.नं. ३८/२०२४ कलम ७ भ्र.प्र.अधिनियम अन्वये दाखल गुन्हयाचे अनुषंगाने त्यांचे मालमत्तेची उघड चौकशी करण्याचे आदेश प्राप्त झाले होते. गै.अ. यांच्या मालमत्तेच्या उघड चौकशी दरम्यान लोकसेवक श्री. छगन उत्तमराव पाटील, सह दुय्यम निबंधक (वर्ग-२) यांनी दिनांक ०२/०३/२०२४ रोजी पावेतोचे त्यांचे सेवा कालावधीत व परिक्षण कालावधी दरम्यान भ्रष्ट व गैरमार्गाने, कायदेशीर ज्ञात उत्नापेक्षा अधिक किमतीची अशी 1,80,80,155/-**रुपये** इतक्या रक्कमेची मालमत्ता संपादित केली असून त्यांची टक्केवारी वजा 284.45 टक्के असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच आ.लो.से. श्री. छगन पाटील यांची पत्नी सौ. वंदना छगन पाटील यांनी सदर मालमत्ता संपादित करण्यासाठी सहाय्य केल्याचे उघड चौकशीमध्ये निष्पन्न झाल्याने गै.अ. आ.लो.से. श्री. छगन उत्तमराव पाटील, सह दुय्यम निबंधक (वर्ग-२) व त्यांच्या पत्नी सौ. वंदना छगन पाटील यांचे विरुध्द पो.स्टे. बेगमपुरा छत्रपती संभाजीनगर शहर येथे सरकार तर्फे चौकशी अधिकारी श्री. सचिन साळुंखे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांचे फिर्यादीवरुन गु.र.नं. 171/2024 कलम 13(1)(ब) व (2) भ्र.प्र.अ.1988 सह भादंवि. कलम 109.प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उप अधीक्षक, श्रीमती संगिता पाटील, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर करीत आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप अधीक्षक, श्रीमती संगिता पाटील, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर करीत आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9823498777

पोलीस उप अधीक्षक :- 8668752530


**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.